RESEARCH FRONT

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

# शिक्षणाचा हक्क अधिनियमातील बालकांचे हक्क व शिक्षकाची भूमिका

**डॉ. अजयकुमार भीमराव पाटील**
सहा. प्राध्यापक,
आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन,सातारा
ई–मेल : rayatpatil45@gmail.com

## सारांश

*शिक्षण हा मानवी विकासाचा केंद्रबिंदू आहे. शिक्षणाचा प्रसार झाल्याषिवाय व्यक्तीचा व राष्ट्राचा विकास अशक्य असतो. त्यामुळे शिक्षण हे राष्ट्राच्या विकासाचे महत्त्वाचे साधन मानले जाते. प्राथमिक शिक्षण हे मानवी साधन संपत्तीच्या विकासाच्या दिषेने टाकलेले पहिले पाऊल आहे. प्राथमिक शिक्षणाचे महत्त्व लक्षात आल्यामुळे अगदी स्वातंत्र्यपूर्व काळापासून प्रत्येक व्यक्तीला मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण मिळाले पाहिजे असा विचार व्यक्त होत होता. इ.स. 1993 मध्ये जे.पी.उन्नीकृष्णन यांनी दाखल केलेल्या केसनंतर मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा गंभीरपणे विचार सुरू झाला व शिक्षणाच्या हक्काची तरतूद राज्यघटनेत करण्याच्या दिशेने वाटचाल सुरू झाली. घटना दुरूस्तीची ही प्रक्रिया इ.स. 2002 ला पूर्ण झाली. मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम हा ऑगस्ट 2009 मध्ये संसदेने संमत केला व त्यानंतर राष्ट्रपतींनी मान्यता दिल्यानंतर हा अधिनियम दि. 1 एप्रिल, 2010 पासून संपूर्ण देशभर लागू करण्यात आला. शिक्षणाच्या सार्वत्रिकरणासाठी केंद्रशासन व त्याच्या जोडीने राज्य शासन विविध योजना राबवित आहेत. शिक्षणाच्या सार्वत्रिकरणासाठीच्या केंद्राच्या व राज्याच्या या प्रयत्नांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियमामुळे अधिक बळ प्राप्त झाले आहे. शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासमोर बरीच आव्हाने आहेत. शिक्षण हक्क अधिनियमातील तरतूदींची अजून अधिक योग्य प्रमाणात अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. या अधिनियमातील बालकांच्या हक्कांची अंमलबजावणी तसेच शिक्षकांसंबंधीची यात दिलेली कर्तव्ये त्यांनी मनापासून पार पाडली तर हया अधिनियमाचा उद्देश निश्चितपणे साध्य होईल व शिक्षणाचे सार्वत्रिकरण सफल होईल.*

## प्रस्तावना

शिक्षण हा मानवी विकासाचा केंद्रबिंदू आहे. व्यक्तीला त्याची जन्मजात प्रतिष्ठा जपण्यासाठी तसेच त्याचा जीवनस्तर उंचावण्यासाठी शिक्षण मिळणे आवष्यक असते. शिक्षण ही व्यक्तीची मुलभूत गरज आहे. तसेच तो व्यक्तीचा हक्क आहे. शिक्षणामध्ये समाजपरिवर्तनाची ताकद असते. शिक्षणाचा प्रसार झाल्याशिवाय व्यक्तीचा व राष्ट्राचा विकास अशक्य असतो. त्यामुळे शिक्षण हे राष्ट्राच्या विकासाचे महत्त्वाचे साधन मानले जाते.

राष्ट्राचा विकास हा मानवी साधन संपत्तीच्या विकासावर अवलंबून असतो. म्हणून राष्ट्राच्या विकासात मानवी साधन संपत्तीचे महत्त्वपूर्ण योगदान असते. मानवी साधन संपत्तीच्या विकासानेच राष्ट्राचा विकास साध्य होत असल्यामुळे राष्ट्रातील मानवी साधन संपत्तीचा विकास करणे हे शिक्षणाचे मुलभूत उद्दिष्ट आहे. प्राथमिक शिक्षण हे मानवी साधन संपत्तीच्या विकासाच्या दिशेने टाकलेले पहिले पाऊल आहे.

प्राथमिक शिक्षणातून व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा पाया घातला जातो. यातून व्यक्तीमध्ये विविध गुणांचे, मूल्यांचे बीजारोपण केले जाते. व्यक्तीच्या व राष्ट्राच्या विकासातील प्राथमिक शिक्षणाचे हे महत्त्व

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

लक्षात आल्यामुळे अगदी स्वातंत्र्यपूर्व काळापासून प्रत्येक व्यक्तीला मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण मिळाले पाहिजे असा विचार व्यक्त होत होता.

**अधिनियमाची पार्श्वभूमी**

स्वातंत्र्यपूर्व काळात विविध समाजसुधारकांनी तसेच सरकारी पातळीवरून अशा दोन्ही स्तरावरून मोफत व सक्तीच्या शिक्षणासाठी प्रयत्न केले गेले. म. जोतिबा फुले, महाराजा सयाजीराव गायकवाड, ना. गोपाळ कृष्ण गोखले, राजर्षी शाहू महाराज, विठ्ठलभाई पटेल, म. गांधी इ. समाजधुरीनांनी मोफत व सक्तीच्या शिक्षणासाठी प्रयत्न केले. तसेच स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणामध्ये सुधारणा करण्याच्या उद्देशाने नेमलेल्या काही आयोगांनी मोफत व सक्तीच्या शिक्षणासंबंधी षिफारशी केलेल्या होत्या. यामध्ये हरगॉट समिती, सार्जंट अहवाल, कोठारी आयोग, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1968 व 1986, जनार्दन रेड्डी समिती इ. चा समावेश होतो.

परंतु खऱ्या अर्थाने इ.स. 1993 मध्ये जे.पी.उन्नीकृष्णन यांनी आंध्रप्रदेश व इतर यांच्या विरोधात दाखल केलेल्या केसच्या निकालात सर्वोच्च न्यायालयाने प्रतिपादन केले की, देशातील नागरिकांना शिक्षणाचा मुलभूत हक्क असून तो कलम 21 मधील आशयातून स्पष्ट होतो. शिक्षणाच्या हक्काचा आशय व निकष कलम 45 व 41 च्या अनुरोधाने निश्चितपणे ठरविता येतो. यानंतर मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा गंभीरपणे विचार सुरू झाला व शिक्षणाच्या हक्काची तरतूद राज्यघटनेत करण्याच्या दिशेने वाटचाल सुरू झाली. घटना दुरूस्तीची ही प्रक्रिया इ.स. 2002 ला पूर्ण झाली. 86 व्या घटनादुरूस्तीने कलम 21 ला एक पोटकलम 'अ' जोडण्यात आले. कलम 45 नव्याने लिहिण्यात आले. तर कलम 51अ मध्ये एका कर्तव्याची वाढ करण्यात आली.

राज्यघटनेतील कलम 21 नुसार मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम अस्तित्त्वात आलेला आहे. मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम हा ऑगस्ट 2009 मध्ये संसदेने संमत केला व त्यानंतर राष्ट्रपतींनी मान्यता दिल्यानंतर हा अधिनियम दि. 1 एप्रिल, 2010 पासून संपूर्ण देशभर (जम्मू व काश्मीर वगळता) लागू करण्यात आला.

**मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम**

मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियमातील मोफत हा शब्द बालकांसाठी लागू आहे. तर मोफत शिक्षण देण्याची सक्ती ही शासन, शैक्षणिक प्रशासन, शाळा, पालक इ.वर आहे. या अधिनियमातील बालकांना शिक्षणाचा हक्क प्राप्त करून देण्याऱ्या तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत.

**कलम – 3 : बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क**

बालकांना 6 ते 14 वर्षापर्यंत त्यांचे प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत नजीकच्या शाळेत शिकण्याचा हक्क आहे.

**कलम – 4 : वयानुसार षिक्षण**

बालकांचे वय 6 वर्षापेक्षा अधिक असेल मात्र त्याने अद्याप कोणत्याही शाळेत प्रवेश घेतला नसेल तर त्याला वयानुसार योग्य त्या वर्गात प्रवेश मिळण्याचा हक्क आहे.

**कलम – 5 : दाखल्याचे हस्तांतरण**

बालक शिकत असलेल्या शाळेत प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्याची सोय नसल्यास त्याला दुसऱ्या शाळेत प्रवेश मिळण्यासाठी विनाविलंब दाखला मिळण्याचा हक्क आहे.

**कलम – 13 : कॅपिटेशन फी व चाळणी प्रक्रियेशिवाय प्रवेश**

प्रवेशप्राप्त बालकांना शाळेत प्रवेशासाठी कॅपिटेशन फी व कोणत्याही चाळणी प्रक्रियेला (मुलाखत, लेखी परीक्षा इ.) सामोरे जावे लागणार नाही.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

**कलम – 14 : वयाचा पुरावा नसल्यासही प्रवेश**

बालकाकडे कोणत्याही प्रकारचा वयाचा पुराव नसेल तरीही त्याला शाळेत प्रवेश मिळण्याचा हक्क आहे.

**कलम – 15 : वर्षभरात कधीही प्रवेश**

बालकाला शाळेमध्ये वाढीव कालावधीपर्यंत प्रवेश मिळण्याचा हक्क आहे.

**कलम – 16 : शिक्षणातील सातत्य**

बालकाला कोणत्याही वर्गात मागे ठेवता येणार नाही व प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्याला शाळेतून काढता येणार नाही.

**कलम – 17 : बालकांना शाारीरिक शिक्षा व मानसिक त्रास देण्यास प्रतिबंध**

कोणत्याही बालकाला शारीरिक शिक्षा किंवा त्याला मानसिक त्रास देता येणार नाही.

**कलम – 30 : मंडळाच्या परीक्षांची सक्ती नाही**

प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत बालकाला कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक असणार नाही.

**कलम – 30 : शिक्षण पूर्तता प्रमाणपत्र**

बालकाने प्राथमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्याला प्राथमिक शिक्षण पूर्तता प्रमाणपत्र मिळण्याचा हक्क आहे.

**कलम – 31 व 32 : हक्कांचे संरक्षण**

बालकांना प्रदान करण्यात आलेल्या हक्कांना संरक्षण मिळण्याचा त्याला हक्क आहे. यासाठी बालक राज्य बालहक्क संरक्षण आयोगाकडे तक्रार नोंदवू  शकतो.

बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009 यामध्ये शिक्षकाची कर्तव्ये व भूमिका स्पष्ट करण्यात आली आहे, ती पुढीलप्रमाणे –

1 शाळेत नियमित व वक्तशीरपणे हजर रहाणे.
2 अभ्यासक्रमपूर्ण करणे.
3 बालकांच्या संपादणूकीचे मूल्यमापन करणे.
4 विद्यार्थ्यांना आवश्यकतेनुसार अतिरिक्त व पूरक मार्गदर्शन करणे.
5 नियमित पालक सभा घेऊन पालकांना बालकांसंबंधी माहिती देणे.
6 प्रत्येक बालकासाठी संकलित नोंदपत्रकात अंतर्भूत असणारी संचिका ठेवणे.
7 प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी होणे.
8 अभ्यासक्रम, पाठयक्रम, पाठयपुस्तक विकसन यासारख्या प्रक्रियेत सहभागी होणे.
9 दखलपात्र बालकांचा शोध, पटनोंदणी, उपस्थिती टिकविणे.
10 वयानुसार किंवा वाढीव कालावधीनंतर प्रवेश दिलेल्या बालकांना विशेष षिक्षण व भावनिक आधार देणे.
11 खाजगी शिकवणी न घेणे.
12 शाळा व्यवस्थापन समितीत सहभागी होणे.
13 कायद्याने निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणे.

**समारोप**

शिक्षणाच्या सार्वत्रिकरणासाठी केंद्रशासन व त्याच्या जोडीने राज्य शासन विविध योजना राबवित आहेत. त्यामध्ये खडू फळा योजना, जिल्हा प्राथमिक शिक्षण कार्यक्रम, मध्यान्ह भोजन, शिक्षण हमी योजना, सर्व शिक्षा अभियान यांचा समावेश आहे. केंद्राच्या सर्व योजनेत राज्यांचा वाटा असतोच. अशाप्रकारे शिक्षणाच्या सार्वत्रिकरणासाठी केंद्र व राज्य सरकार प्रयत्नशील आहेत.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

शिक्षणाच्या सार्वत्रिकरणासाठीच्या केंद्राच्या व राज्याच्या या प्रयत्नांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियमामुळे अधिक बळ प्राप्त झाले आहे. शिक्षण हक्क अधिनियमातील तरतूदींची अजून अधिक योग्य प्रमाणात अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. अजूनही मोठया प्रमाणात बालके शिक्षणाच्या प्रवाहाबाहेर आहेत. त्यांना शिक्षणाच्या मुख्य धारेशी जोडणे आवश्यक आहे. शाळेत प्रवेशित झालेल्या मुलांमध्ये विविध कारणांनी गळतीचे प्रमाण फार आहे. त्यामुळे त्यांच्या शिक्षणात सातत्य आणण्याचे फार मोठे आव्हान आहे. बालकांना नुसतेच शाळेत आणून चालणार नाही तर त्यांच्या शिक्षणात सातत्य रहाण्यासाठी प्रयत्न करणे तसेच त्याला गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे आवश्यक आहे.

अजूनही बऱ्याच खाजगी शाळांमधून प्रवेशासाठी बालकांना मुलाखतीला सामोरे जावे लागत आहे. शाळेच्या पहिलीच्या वर्गाच्या एकूण विद्यार्थ्यांपैकी 25 टक्के पर्यंतच्या जागा नजिकच्या परीसरातील वंचित गटाच्या आणि दुर्बल घटकातील बालकांच्या प्रवेशासाठी अजूनही खाजगी शाळांच्याकडून टाळाटाळ केली जात आहे. शिक्षणाचा हक्क अधिनियमानुसार शिक्षकांच्या वरील अशैक्षणिक कामाचा बोजा कमी झाला आहे. निवडणूक, जणगणना आणि आपत्ती व्यवस्थापन ही कामे राष्ट्रीय कर्तव्ये म्हणून राहिलेली आहेत. यामुळे शिक्षकांना त्यांच्या शैक्षणिक कामासाठी अधिक वेळ मिळेल अशी अपेक्षा आहे. पण हया वेळेचा वापर गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी होणे आवश्यक आहे. अशाप्रकारे शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासमोर बरीच आव्हाने आहेत. त्यावर मात करण्यासाठी शिक्षणाशी संबंधित सर्व बाजूने प्रयत्न होणे अपेक्षित आहे. बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियमातील बालकांच्या हक्कांची अंमलबजावणी तसेच शिक्षकांसंबंधीची यात दिलेली कर्तव्ये त्यांनी मनापासून पार पाडली तर हया अधिनियमाचा उद्देश निश्चितपणे साध्य होईल व शिक्षणाचे सार्वत्रिकरण सफल होईल.

**संदर्भ**

1. The Gazette of India, Extraordinary Part – II Section I, 27 Aug., 2009
2. महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार – ब 11 आक्टो., 2011
3. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम – 2009 मार्गदर्शिका (2012) महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे